पदोन्नतीच्या वेळी वेतननिश्चितीकरिता विकल्प - स्पष्टीकरण.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन शुध्दिपत्र क्रमांक-वेतन १०८६/सीआर-१५१/सेवा-३,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २४ फेब्रुवारी १९८६.

## शासन शुध्दिपत्र

शासन परिपत्रक शासन क्रमांक-वेतन १०८५/सीआर-७९९/८५/सेवा-३, दिनांक ५ डिसेंबर १९८५ अनुसार अनुक्रमांक १ मध्ये संदेहाचा मुद्दा व स्पष्टीकरण हे रद्द समजण्यात येऊन त्याऐवजी पुढीलप्रमाणे अनुक्रमांक १ मध्ये संदेहाचा मुद्दा व स्पष्टीकरण सुधारित करण्यात आहे:-

| अनुक्रमांक | संदेहाचा मुद्दा | स्पष्टीकरण |
|---|---|---|
| १. | तदर्थ तत्वावर (Ad hoc basis) देण्यात आलेल्या पदोन्नतीच्या बाबतीत-ही विकल्प अनुज्ञेय असावा काय? | नाही. तदर्थ तत्वावर देण्यात आलेल्या पदोन्नतीच्याबाबतीत विकल्प अनुज्ञेय नाही. तथापि, अशा प्रकारच्या पदोन्नती नंतर कोणताही खंड न पडता वरच्या पदावर नियमित नियुक्ती झालेली असेल त्याबाबतीत वरच्या पदावरील सुरवातीच्या नियुक्तीच्या दिनांकापासून हा विकल्प अनुज्ञेय असेल आणि तो अशा प्रकारच्या नियमित नियुक्तीच्या दिनांकापासून एक महिन्याच्याआत द्यावा लागेल. |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

म.का. आरोळे,
अवर सचिव,
वित्त विभाग.

प्रति,

महालेखापाल [लेखा व अनुज्ञेयता], महाराष्ट्र-१, मुंबई,
महालेखापाल [लेखा परीक्षा], महाराष्ट्र-१, मुंबई,
महालेखापाल [लेखा व अनुज्ञेयता], महाराष्ट्र-२, नागपूर,
महालेखापाल [लेखा परीक्षा], महाराष्ट्र-२, नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी,
निवासी लेखा अधिकारी, मुंबई,

[कृ.मा.प.]



Scanned by CamScanner
Scanned by CamScanner